# प्रकरण - ३ रे

## बार्शी शहरातील ज्वारी बाजाराचा विकास

बार्शी शहरातील ज्वारी बाजाराचा इतिहास आणि झालेला विकास याचा विचार करण्याअगोदर बार्शी शहराची व्यापारी आणि औद्योगिक परंपरा विचारात घेणे उचित ठरेल. " मुंबईकर निर्यातदारांची धनलक्ष्मी आणि मराठवाड्याची कृषी संपत्ती यांचा प्रीतिसंगम बार्शीला घडून आल्यामुळे बार्शी शहराचे भाग्य उजळलेले दिसून येते." बार्शी नगरपालिका शताब्दी गौरव ग्रंथ, १९६५ मधील डी.पी.कुलकर्णी, माजी सचिव, कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी यांचे वरील विचार आजही बार्शीच्या व्यापारी परंपरेला अनुसरून आहेत.

शहाजोग व्यापारपेठ म्हणून फार जुन्या काळापासून बार्शी बाजारपेठेची ख्याती आहे. अठराव्या शतकापूर्वी सुमारे ३ ते ४ हजार वस्ती असलेल्या या छोटेखानी गावाची आजच्या शहर अवस्थेपर्यंत वाढ झाली ती मुख्यत: येथील व्यापारामुळेच. व्यापारात संपादन केलेल्या संपत्तीतूनच बार्शीचे नागरी जीवन घडविले गेले. व्यापारामुळेच नागरिकांना उपजीविकेचे साधन मिळाले, सार्वजनिक संस्थाना निधी व नेतृत्व लाभले, कारखानदारीला प्रेरणा, कच्चामाल व भांडवल यांचा पुरवठा झाला. अशा रीतीने बार्शीच्या भावी प्रगतीचा पाया घातला गेला. बार्शी शहराच्या व्यापारी व औद्योगिक वाढीचा इतिहास लक्ष वेधून घेणारा आहे.

ऐतिहासिक कालापासून बार्शी हे व्यापारी उलाढालीचे केंद्र होते. परंतु त्यावेळी दळणवळण व वाहतुकीची साधने आजच्या इतकी प्रगत नव्हती.

बैलाच्या पाठीवर मालाच्या गोण्या टाकून लमाणांचे तांडेच्या तांडे या पेठेतून त्या पेठेत मीठ, मिरची, मसाल्याचे पदार्थ, नारळ, कापड, किराणा माल या जिनसांची देव घेव करीत हिंडत असत. अशा काळी व्यापारी उलाढाली लहान प्रमाणावर होत्या. त्या मानानेच बार्शीला व्यापार होत असे. त्या काळात बार्शी तालुक्यातील वैराग हे गाव व्यापारात बार्शीच्या पुढे होते. १८५९-६० मध्ये कुर्डुवाडीला रेल्वे लाईन आली व तेथून पुढे कुर्डुवाडी ते बार्शी अशी सडक ही तयार झाली. तेंव्हा पासून बार्शीला खरे व्यापारी महत्व प्राप्त झाले. याच वेळी १८६१ ते १८६५ च्या अमेरिकेतील यादवी युध्दाचा भारताच्या अंतर्गत व्यापारावर अत्यंत दूरगामी असा परिणाम झाला. कापूस, गळिताची धान्ये इत्यादीं-ची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी वाढल्याने निर्यातदारांचे प्रतिनिधी अशा वस्तूंच्या खरेदीसाठी देशातील पेठात जाउन मालाची निर्यातीसाठी, खरेदी करु लागले. त्यामुळे व्यापाराला चालना मिळाली. याच वेळी बार्शी पेठेला उर्जितकाळ आला. १९ व्या शतकाच्या अखेरीस येथे पोस्टाची व्यवस्था झाली तर १९०४ मध्ये कुर्डुवाडी ते बार्शी अशी नॅरोगेज रेल्वे लाईन तयार झाली आणि पुढे १९११-१२ मध्ये हीच रेल्वे लाईन बार्शी ते लातूर पर्यंत गेली. १९०४ नंतर बार्शी ते कुर्डुवाडी, बार्शी ते सोलापूर, बार्शी ते लातूर, बार्शी ते बीड, परळी, परभणी इत्यादी रस्ते तयार झाले व बार्शी बाजार पेठेला वाहतूक आणि दळणवळण क्षेत्रातील या अनुकूल परिस्थीती-चा भरपूर फायदा मिळाला.

मराठवाडयाच्या सीमारेषेवर एखाद्या बेटासारखा हा बार्शी तालुका वसलेला आहे. त्यामुळे बार्शी व मराठवाडा यांचा ऋणानुबंध फार जुना आहे. खंडोगणती माल मराठवाडयाने पिकवावा आणि विक्रीसाठी बार्शीस पोचता करावा असे वर्षानुवर्षे चालत आलेले आहे. मराठवाडयातील

१५0 मैलापर्यंतचा म्हणजे कंदार, करकली, लातूर, बीड, नांदेड, परभणी वगैरे ठिकाणचा व त्या आसपासचा शेतीमाल बार्शीस आणून विकला जात असे. १८६१-६५ च्या सुमारास या भागातून मोठयाप्रमाणावर कापूस बार्शीला येऊन त्याच्या गाठी मुंबईस रवाना केल्या जात असत. तसेच गळितधान्ये आणि ज्वारीचीही या भागातून बार्शी पेठेत फार मोठी आवक होत असे. ज्वारीच्या आवकेमध्ये त्यावेळी पिवळी आणि कार ज्वारी या जुन्या वाणाची आवक मोठया प्रमाणावर होत असे. वरील माल विकून परतणारे व्यापारी व मालधनी सुपारी, नारळ, मीठ व किराणा माल घेऊन जात असत. अशा रितीने १९ व्या शतकाच्या अखेरीस मराठवाडयात पिकलेल्या मालाची बाजारपेठ आणि मराठवाडयाला लागणा-या मालाची उतारपेठ म्हणून बार्शीची सर्वत्र ख्याती पसरली होती. म्हणून बार्शी पेठेला मराठवाडयाचे प्रवेशद्वार असेही म्हटले जात असे. याच काळात बार्शीचे व्यापारी संबंध मुंबई व इतर निरनिराळ्या शहराशी जोडले गेले होते. याच वेळी ब्रिटिश कंपन्या व डच कंपनीशी संपर्क ठेवता यावा म्हणून बार्शीचे महादाप्पाशेठ कथले यांनी मुंबई व कलकत्ता यासारख्या ठिकाणी आपल्या पेढया त्याकाळी सुरु केल्या होत्या. असे व्यापारी बार्शी बाजार पेठेस लाभले ही विशेष महत्वाची गोष्ट आहे.

बार्शीपेठेत व्यापारी उलाढालीत होत असलेल्या वाढीमुळे बार्शीपेठ गजबजून गेली. शेतीमाल घेऊन येणा-या बैलगाडयासाठी धावपट्टे वगैरे लोखंडी सामान तयार करण्याचे काम लोहाराना मिळाले. चाक जोडया दांड, साट्या इत्यादी लाकडी सामान तयार करण्याचे काम सुताराना मिळाले आणि सोल, नाडे, दो-या, काण्या वगैरे तयार करण्याचे काम मांग-महाराना मिळाले. मोगलाईतील सरंजामदार, जहागीरदार यांची दागदागिन्याची खरेदी बार्शी पेठेतच होऊ लागली. हुंडया चिठ्ठयांची

दलाली करणारे याना सोन्याचे दिवस आले. हातमाग चालू झाले आणि कोष्टी, साळी रंगरेज त्यावर जगू शलागले. अशा प्रकारे याकाळात सराफ, किराणा, अडत, लोखंडी सामान, कापड, जनावरे वगैरे वस्तूंचा व्यापार बार्शी पेठेत तेजीत चालू लागला. बार्शीपेठेतील मुख्य बाजार म्हणजे अडत बाजार होय. तो अनेक वर्षांपासून अस्तित्वात होता. बार्शी बाजार पेठेच्या इतिहासातील तेजस्वी कालखंड म्हणजे अमेरिकन यादवी युध्दाच्या कालापासून म्हणजे १८६१ पासून ते बार्शी-लातूर रेल्वे मार्ग अस्तित्वात आला तोपर्यंतचा म्हणजे १९११-१२ पर्यंतचा काळ. यावेळी बार्शीतील सोमवार पेठेत व्यापार चालत असे. पुढे तो हळूहळू सरकत ऐनापूर मारुती देवळाच्या परिसरात गेला. सध्या तो गावाबाहेर रेल्वे स्टेशन आणि एस.टी.स्टॅन्डच्या जवळच असलेल्या " पंडित जवाहरलाल नेहरु मुख्य बाजार आवार" या नावाने ओळखल्या जाणा-या बाजार समितीच्या स्वत:च्या मालकीच्या जागेत चालत आहे.

अगदी सुरुवातीला बार्शीतील अडत बाजार अस्तित्वात आणण्याच्या दृष्टीने बार्शीतील १० ते १५ व्यापारी मंडळींनी पुढाकार घेतलेला होता. १९ व्या शतकाच्या अखेरीस संभुअप्पा व महादाप्पा कथले, विठोबाप्पा घोडके साखरे, ऐनापुरे, शिलवंत, हरीबा निलाखे, आण्णा भीमसिंग, र.प्र.करवा, कस्तूरचंद शहा, बसलिंग बुचडे, बुरांडे, विरुपाक्षाप्पा सोनके, महादाप्पा देवणे, कवठेकर, बंग, मालू किलचे, सिंद्रामप्पा मंगरूळ, ठोकडे, देशमुख इत्यादी अडते होते. १९११-१२ मध्ये बार्शी-लातूर रेल्वेमार्ग झाल्यापासून बार्शीच्या कापूस बाजाराला उतरती कळा लागून तेलबिया, तृणधान्ये आणि यात विशेषत: ज्वारीच्या व्यापारामध्ये वाढ झाल्याने अडत व्यापार अधिक विकसित होण्यास मदत झाली.

बार्शीपेठेत अडत बाजारांचा विकास घडवून आणण्यासाठी आता-

पर्यंत बार्शी पेठेला जे अग्रणी लाभले ते दूरदृष्टीचे होते. प्रथमत: विठोबाप्पा घोडके व आप्पासाहेब कथले आणि त्यानंतर काकासाहेब झाडबुके यांच्या मार्गदर्शनाखाली अडत बाजाराचे कामकाज चालत असे. त्यापुढे भाऊसाहेब झाडबुके यांच्या नेतृत्वाचा बार्शी पेठेस लाभ मिळाला. महत्वाची बाब म्हणजे उत्तम रितीरिवाज, चोख व सचोटीचा व्यापार या बाबत बार्शी बाजार पेठेची सर्वत्र ख्याती होती आणि आहे. आणि त्याचे श्रेय बाजार पेठेतील पुरोगामी व समंजस व्यापारी वर्गास आणि बाजारपेठेच्या कुशल व बुध्दिवादी नेतृत्वास दिले जाते. व्यापार वाढल्यानंतर परिसरातील अनेक ठिकाणच्या व्यापाऱ्यांनी बार्शी पेठेत गर्दी केली. प्रसंगी कटुता पत्करुन देखील पेठेची पूर्वापार सचोटी टिकवली ती आप्पासाहेब कथले, काकासाहेब झाडबुके यासारख्या व्यापारी धुरीणानी. म्हणूनच बार्शी बाजारात अडत बाजाराचा विकास होत गेला. १९४९ पासून बार्शी बाजार समितीने आपल्या प्रत्यक्ष कार्याला प्रारंभ केल्यापासून एकूण शेती-मालाच्या आवकेचा विचार केल्यास तीमध्ये १९४९-५० ते १९८६-८७ या काळात १,५४,४८६ क्विंटलवरुन २,७३,७६३ क्विंटल पर्यंत वाढ झाली. १९४७ साली अडत बाजारास "मार्केट अॅक्ट" लागू करण्यात आला व बाजाराच्या नियंत्रणासाठी व विकासासाठी १९४९ मध्ये बाजार समिती स्थापन झाली. बाजार पेठेविषयी काही नवीन योजना व कल्पना यामुळे कार्यवाहीत येण्यास संधी मिळाली. त्यातूनच यथावकाश बंदिस्त पध्दतीची, विस्तीर्ण आणि सर्व आवश्यक सुविधानी परिपूर्ण अशी अद्यावत विनियमित बाजारपेठ बार्शीला लाभली आहे.

मराठी साहित्यात बार्शी लाईट रेल्वे ही विनोदाचा विषय असली तरी बार्शीच्या व्यापारी प्रगतीत तिचा सिंहाचा वाटा आहे. बार्शीतील अडत बाजारात अगदी प्रथमपासूनच ज्वारी बाजाराचा वाटा

सर्वाधिक आहे. त्यामुळे आजही बार्शीपेठेची ज्वारीची बाजारपेठ म्हणून सर्वत्र ख्याती आहे. बार्शीची "शाळू" सर्वत्र प्रसिध्द आहे. बार्शी बाजारपेठेत ज्वारी बाजाराचा जो विकास होत गेला आणि बार्शी बाजारपेठ ज्वारी बाजारासाठी प्रसिध्द आहे त्याची जी कारणे आहेत त्याचा विचार करताना बार्शी शहराला ज्या विविध सुविधांचा लाभ झाला तसेच बार्शी शहराला जो परिसर लाभला या दोन गोष्टींना विशेष महत्व द्यावे लागते.

मराठवाड्याच्या सीमारेषेवर एखाद्या बेटासारखा वसलेला बार्शी तालुका हा सोलापूर जिल्हयातील ज्वारी पिकवणारा एक महत्वाचा तालुका आहे. त्यामुळे बार्शीला ज्वारी बाजार विकसित होण्यास मदत झाली. महत्वाचे म्हणजे बार्शी आणि मराठवाड्याचा फार पूर्वीपासून व्यापारी संबंध असल्याने व मराठवाड्यात ज्वारीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असल्याने ही ज्वारी बार्शी पेठेत विक्रीसाठी आणली जाते. अलिकडील काळात मराठवाड्यातून येणा-या ज्वारीच्या आवके मध्ये जुन्या वाणाच्या बाबतीत घट झाली असून संकरीत ज्वारीची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

कोणत्याही बाजारपेठेचा इतिहास विचारात घेतल्यास त्याच्या विकासाला स्थानिक नेतृत्वाचे मार्गदर्शन आणि मदत या गोष्टी विशेष कारणीभूत ठरतात. उदाहरणार्थ कोल्हापूर मध्ये बाजाराच्या विकासाला छत्रपती शाहू महाराजांचे नेतृत्व, मार्गदर्शन आणि मदत लाभल्यामुळेच तेथे बाजार पेठेचा विकास झपाट्याने होऊ शकला. बार्शी बाजार पेठेला अगदी प्रथमपासूनच पुरोगामी, समंजस, बुध्दिवादी व व्यापारी कौशल्य असणारे अग्रणी लाभले. त्यामुळे बार्शीत अडत बाजाराचा विकास झाला. घोडके, झाडबुके आणि कथले या अग्रणींनी सुरुवातीपासूनच व्यापार क्षेत्रातील

पुढाकाराबरोबरच ज्वारी बाजारातही पुढाकार घेतला. आजही त्यांच्या पेढयांचा नावलौकिक बार्शी बाजारपेठेत ज्वारीचे व्यापारी म्हणूनच आहे. या व्यापारी मंडळींनी बार्शीपेठेतील उत्तम रितीरिवाज, चोख व सचोटीचा व्यापार याबाबत बार्शी पेठेची असलेली ख्याती टिकवून ठेवली आहे.

शेतीमाल विक्री व्यवस्थेच्या प्रगतीसाठी वाहतूक आणि दळणवळण व्यवस्था ही विकसित आणि विस्तारित होणे आवश्यक असते. त्यादृष्टीने बार्शी शहराचा विचार केल्यास बार्शी शहर हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील प्रमुख बाजार पेठेशी रेल्वे आणि रस्ता वाहतुकीने जोडले गेले असल्याने बार्शीत ज्वारी बाजाराच्या विकासाला हातभार लागला. शिवाय बार्शीपेठेत मराठवाडा व सभोतालच्या परिसरातून येणारी खंडोगणती ज्वारी ही वाहतुक आणि दळणवळण व्यवस्थेची सुविधा असल्यामुळेचयेऊ शकली. कोल्हापूर, सातारा, सांगली, मुंबई इत्यादी महाराष्ट्रातील बाजारपेठा मध्येच नव्हे तर प.बंगाल, गुजराथ, इत्यादी राज्यातही मोठया प्रमाणावर ज्वारीची रवानगी होते. तीही वाहतूक सुविधांच्या कारणामुळेच. यातूनच बार्शीतील ज्वारीचा बाजार विकसित होण्यास आणखी हातभार लागला.

शेतीमाल विक्री व्यवस्थेमध्ये पतपुरवठयाची सुविधा हा एक महत्वाचा भाग मानला जातो. बँका म्हणजे आधुनिक व्यापार उद्योगाच्या जीवनदात्या समजल्या जातात. म्हणून आधुनिक काळात बँका शिवाय व्यापार उद्योगाला पूर्णत्व येऊच शकत नाही. बार्शी शहराला पूर्वीपासूनच अनेक बँकांच्या सेवेचा लाभ घेता आला. इंपिरियल बँक ऑफ इंडिया, (स्टेट बँक ऑफ इंडिया), बँक ऑफ इंडिया, अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक या

जुन्या बॅन्का तर १९३८ मध्ये सेंट्रल बॅन्क १९४१ मध्ये युनायटेड बॅन्क आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिरज स्टेट बॅन्क, बेळगाव बॅन्क, महाराष्ट्र बॅन्क, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्क इत्यादी बॅन्कांच्या शाखा बार्शीत सुरु झाल्याने बाजारपेठेला पतपुरवठा होउ शकला व व्यापार विकासाच्या दृष्टीने ते उपयुक्त ठरले. याशिवाय सावकार व सराफी पेढीवाले यांचीही परंपरा बार्शीत फार जुनी आहे. त्यानीही कर्जपुरवठा करुन ज्वारी बाजाराच्या विकासाला हातभार लावला. सध्या बार्शीमध्ये एकंदर १४ बॅन्कांच्या शाखा व्यापारासाठी अर्थपुरवठा करतात. त्यामुळे सामान्यत: अडत बाजार विकासाला चालना मिळाली व त्यातही विशेषत: ज्वारी बाजारातील उलाढाल वाढली. शेतीमाल धन्यास विक्री झाल्याबरोबर ज्वारीची किंमत रोख स्वरुपात मिळणे शक्य झाले. याचाही परिणाम म्हणून बार्शी पेठेत विविध शेतीमालाची, विशेषत: ज्वारीची, मोठया प्रमाणावर आवक होत राहिली आहे.

उत्तम रितीरिवाज आणि चोख व सचोटीचा व्यापार यासाठी बार्शीपेठेची ख्याती असली तरी बाजार विनियमना पूर्वी शेतीमाल विक्री व्यवहारात अनेक अनिष्ट प्रथा अस्तित्वात होत्या. बाजार खर्चाचे दर व्यापाऱ्याच्या लहरीनुसार आकारले जात असत. धर्मादा, सूट, सांड, कडता, दबाता अशा अनिष्ट पध्दती बाजार समितीच्या स्थापने बरोबरच संपुष्टात आल्या. बाजार खर्चाचे दर उपविधीद्वारे ठरवून देण्यात आले. उघड लिलाव पध्दती बार्शीबाजारात पूर्वापार चालत होती, त्यात सुधारणा करण्यात आल्या. शेतीमाल विक्रीचा वेग वाढवून बाजारात येणाऱ्या शेतीमालाची विक्री लवकरात लवकर पूर्ण करण्याची प्रथा जाणीवपूर्वक प्रत्यक्षात उतरविण्यात आली. शेतीमालाचे वजन चोख व्हावे म्हणून फिरती वजन व्यवस्था व प्रमाणित वजनमापांचा अवलंब करण्यात आला. शेतकऱ्यास

त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळावी व ग्राहकास पसंतीनुसार माल मिळावा म्हणून १९६०-६१ पासून व्यापारी प्रतवारीच्या कामाला बार्शीपेठेत सुरुवात झाली. ज्वारी ही प्रथमपासूनच व्यापारी प्रतवारी करण्यात येणा-या दोन शेतीमालापैकी एक आहे. भुईमूग हा दुसरा शेतीमाल होय.

बाजार माहितीचे संकलन आणि प्रसिध्दी याबाबतही बार्शी-पेठेची सुरुवातीपासूनच ख्याती आहे. बाजार समितीच्या अस्तित्वानंतर दैनंदिन विविध वस्तूंच्या किमतीतील बदल, आठवड्यातील बाजारभाव व आवकेतील बदल याबाबत माहिती जमा करुन ती वर्तमानपत्र, रेडिओ वगैरे माध्यमातून शेतक-यापर्यंत पोचविली जाते. त्यामुळे बार्शीपेठेची ख्याती वाढत गेली व बार्शीत अडत बाजार व त्यातही ज्वारी बाजाराचा विकास झाला.

कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी ही महाराष्ट्र राज्यातील एक जुनी आणि नामांकित बाजार समिती आहे. तिची स्थापना १९४७ मध्ये झाली असली तरी प्रत्यक्ष कार्याला १९४९ मध्ये प्रारंभ झाला. म्हणजे बार्शीपेठेत बाजार समितीच्या कार्याला जवळजवळ चाळीस वर्षे पूर्ण होत आली आहेत. या काळात विनियमित बाजार समिती स्थापनेमागे जे उद्देश आहेत ते कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शीने बरेच पूर्ण केलेले दिसून येतात. बाजार समितीच्या स्थापनेनंतर बार्शीपेठेत ज्या काही अनिष्ट प्रथा होत्या त्या नाहीशा करण्यात आल्या व विविध सुधारणा घडवून आणल्या गेल्या. उदाहरणार्थ, विनियमित शेतीमालाच्या संख्येत वाढ, प्रतवारी कार्यात वाढ, बाजार माहिती संकलन व भाव प्रसिध्दी-करण, सहकारी संस्थांची वर्जवसुली यामुळे बार्शी पेठेतील व्यापारी उलाढाली

मध्ये सतत वाढ होत गेली. विशेषत: ज्वारी बाजारामध्ये १९५८-५९ ते १९८६-८७ या २९ वर्षात व्यापारी उलाढालीमध्ये ९१,७३,३०३ रुपयावरुन १,०६,१८,६९७ रुपयापर्यंत वाढ झाली. बार्शीतील ज्वारी बाजाराच्या विकासाला मराठवाडयाच्या सीमेवर असलेल्या येडशी - तडवळे या उपबाजारानेही मोलाची मदत केली आहे. सध्या येडशी-तडवळे हा भाग उस्मानाबाद तालुक्यात गेला असला तरी तेथील व्यापारी संबंध हे पूर्वीप्रमाणे बार्शीपेठेशी टिकून आहेत. एकंदरीत, बार्शीपेठेतील व्यापारी व शेतकरी यांच्यात योग्य समन्वय साधून बाजार समितीने आतापर्यंत बाजार समिती व व्यापारी तसेच व्यापारी व शेतीमालधनी यांच्यामध्ये संघर्षाची वेळ कधीच येऊ दिली नाही. ही गोष्टही बार्शी - पेठेत ज्वारीच्या बाजाराचा विकास होण्यास कारणीभूत ठरली आहे.

=x=x=x=x=x=

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR